**विभागाचे नाव – ऊर्जा निर्मिती-२ विभाग, महाऊर्जा, पुणे**

**ध्येय-** राज्यात आधिक आधिक हरित ऊर्जा प्रकल्पाद्वारे वीज उपलब्ध करुन देण्याच्या योजना राबविणे, अपारंपरिक ऊर्जा निर्मितीस चालना देणे व सुविधा पुरविणे

| योजनेचे नाव | योजनेची थोडक्यात माहिती | लाभ होणारे घटक | आवश्यक कागदपत्रे | नियमावली |
|---|---|---|---|---|
| कृषि अवशेषांवर आधारित ऊर्जा निर्मिती प्रकल्प | १. कृषि अवशेष हा नैसर्गिक ऊर्जा निर्मितीचा महत्वाचा स्त्रोत आहे. यामध्ये लाकूडफाटा, शेतीतील टाकाऊ अवशेष यांचा समावेश होतो.<br>२. राज्यांत अशा ऊर्जा स्त्रोतापासून ७८१ मे.वॅ. इतकी वीज निर्मिती करण्यास वाव आहे.<br>३. अपारंपरिक ऊर्जा निर्मितीचे नवीन धोरण-२००८ दि.१४-१०-२००८ अंतर्गत ४०० मे.वॅ. क्षमतेचे असे प्रकल्प कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट.<br>४. सद्य:स्थितीत, राज्यामध्ये एकूण ४०२ मे.वॅ. क्षमतेचे ३६ प्रकल्प मंजुर करण्यात आले आहेत. त्यांपैकी १४७ मे.वॅ. क्षमतेचे १४ प्रकल्प वेळोवेळी कार्यान्वित झाले आहेत.<br>५. उर्वरित प्रकल्प उभारणीच्या निरनिराळ्या टप्प्यांत आहे. | १. शेतकरी<br>२. बेरोजगार युवक<br>३. ग्रामीण समाज<br>४. वीज ग्राहक<br>५. कुटीर उद्योग<br>६. स्थानिक पारेषण वाहिनी सुदृढीकरण | १. सविस्तर प्रकल्प अहवाल (२ प्रती)<br>२. प्रकल्पासाठी ग्रामपंचायतीचे नाहरकतपत्र<br>३. जागा मालकीची कागदपत्रे (७/१२ / इंडेक्स-२)<br>४.भूविज्ञान-खनिकर्म संचालनालयाचा ना-हरकत दाखला<br>५. राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचा परवाना<br>६. पाणी उपलब्धतेबाबतचा पाटबंधारे विभागाचा परवाना<br>७. वित्त पुरवठ्यासाठी वित्त संस्था/बॅंक यांचे संमतीपत्र<br>८. प्रकल्पाची व पारेषण व्यवस्थेची सक्षम प्राधिकरणाची प्रमाणित एक-रेषीय आकृती (सिंगल लाईन डायग्रॅम)<br>९. पारेषण जोडणीसाठी परवाना धारक कंपनीकडून संमतीपत्र.<br>१०. प्रकल्प स्थळ, पाणी उपलब्धता व नजीकचे विद्युत उपकेंद्र दर्शविणारा नकाशा<br>११. कार्यप्रणाली स्तंभ लेख (ॲक्टिव्हिटी बार चार्ट)<br>१२. वित्तीय सक्षमता (financial capability) बाबतची संबंधित वित्त संस्था / बॅंक यांचे पत-प्रमाणपत्र (solvency certificate)<br>१३. ३० टक्के भागभांडवल उभारण्याची क्षमता सिध्द करणारी सनदी लेखापाल प्रमाणित कागदपत्रे | ऊर्जा निर्मितीचे धोरण दिनांक १४-१०-२००८ अंतर्गत विहीत कार्यपध्दती दि. १४-०७-२०१० नूसार आवश्यक पूर्तता. |

**नेहमी विचारले जाणारे प्रश्न-**

१. कृषी अवशेषांवर आधारित वीज निर्मिती करण्याच्या पध्दती कोणत्या?

- अ) ज्वलन (रँकाइन सायकल)
  ब) गॅसीफिकेशन (ओटो सायकल)

२. कृषी अवशेषांवर आधारित वीज निर्मितीकरिता जळणासाठी वापरण्यात येणारा कच्चा माल कोणता ?

- अ) टाकाऊ तृण अवशेष - कपाशीची बोंडे, ऊसाची चिपाडे.
  ब) शेती व्यवसायामधील टाकाऊ कचरा - भाताची तूस, टरफले, नारळांची छिलके, लाकडाचा भुसा.
  क) बाभळीच्या काट्या/लाकूडफाटा.

३. महाराष्ट्रामध्ये कृषी अवशेषांवर आधारित वीज निर्मिती करणारे किती प्रकल्प कार्यान्वित आहेत ?

- एकूण १६२ मे.वॅ. क्षमतेचे १५ प्रकल्प कार्यान्वित आहेत.

४. कृषी अवशेषांवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पांच्या मान्यतेसाठी कोणती पध्दत आहे?

- कृषी अवशेषांवर आधारित वीज निर्मिती प्रकल्प त्रिस्तरीय पध्दतीने मंजूर केले जातात, ती पध्दत पुढीलप्रमाणे -

  अ) पारेषण जोड संमतीसाठी शिफारस
  ब) मुलभूत सुविधा संमती
  क) प्रकल्प कार्यान्विततेची मंजुरी

५. कृषी अवशेषांवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेचा विक्री दर किती आहे ?

- सन २०१२-१३ साठी वीजेचा विक्री दर रु.५.४१/युनिट इतका आहे.

६. कृषी अवशेषांवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पाचा प्लान्ट लोड फॅक्टर किती असतो?

- कृषी अवशेषांवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पाचा प्लान्ट लोड फॅक्टर ८० टक्के व त्यापेक्षा अधिक लागतो.

७. अशा प्रकल्पांसाठी केंद्र/राज्य शासनाकडून किती अनुदान मिळू शकते?

- **(अ) केंद्र शासनाचे अनुदान :** रु. २० लक्ष X (क्षमता मे.वॅ. मध्ये) ^०.६४६
  * केंद्र शासनाकडील अनुदानाच्या अद्ययावत माहितीसाठी नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांचे संकेत स्थळ www.mnre.gov.in येथे भेट द्यावी.

  **(ब) राज्य शासनाचे अनुदान :**

  १. निष्कासन व्यवस्थेचा खर्च (३३ के.व्ही. आणि त्यावरील) - एकुण खर्चाच्या ५० टक्के परंतू कमाल रु.२ कोटी/प्रकल्प एवढे अनुदान हरित ऊर्जा निधीच्या उपलब्धतेनुसार उपलब्ध.

  २. विद्युत शुल्क माफी - प्रकल्पांतर्गत निर्माण होणारी वीज निजी अथवा तिसऱ्या घटकासाठी वापरल्यास प्रकल्प कार्यान्विततेच्या दिनांकापासून पहिल्या १० वर्षांकरिता विद्युत शुल्कात माफी.

## Frequently Asked Question's:

Q.1 What are the different routes of power generation from biomass?

Ans. a) Combustion (Rankine Cycle)

b) Gasification (Otto Cycle)

Q.2 What are the feed materials required?

Ans. a) Crop residues: Cotton stalks, Sugarcane trash,

b) Agro industrial residues: Paddy straw, Coconut shell, Saw dust,

c) Julia flora, Forest residue.

Q.3 How many biomass based projects have got commissioned in Maharashtra?

Ans. 15 Biomass Power Projects totalling 162 MW capacities have commissioned in Maharashtra.

Q.4 What is sanctioned procedure for Biomass Power Projects?

Ans. Three stages sanctioning procedure-

i) Recommendation for Grid Connectivity

ii) Infrastructure Clearance

iii) Commission Clearance

Q.5 What is the regulation tariff for Biomass Power Projects?

Ans. Rs. 5.41/Kwh for the year 2012-13.

Q.6 What is plant load factor for Biomass power Project?

Ans. PLF 80% or more

Q.6 How much Subsidy for Biomass Power Project from State Govt. / Central Govt.?

Ans. A. **Central:** Rs.20 lakh X (Cap in MW) ^0.646

* For more details, MNRE official site be seen at www.mnre.gov.in.

B. **State:** a) Reimbursement of 50 % evacuation cost (33kv & above) after commissioning.

b) Electricity duty exemption for 10 years (captive & 3rd party sale)